RNI No. MAHBIL /2009/31732

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## भाग चार-अ

वर्ष १०, अंक ९]　　गुरुवार ते बुधवार, मे १६-२२, २०२४/वैशाख २६-ज्येष्ठ १, शके १९४६　　[पृष्ठे ५, किंमत : रुपये ९.००

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२,
दिनांक १५ मे २०२४.

### अधिसूचना

**आधार (वित्तीय व इतर अर्थसहाय्य, लाभ व सेवा यांचे लक्ष्यित वितरण) अधिनियम, २०१६.**

क्रमांक संकीर्ण-८२२४/प्र.क्र. ४८/भाग-१/सां.का ४.—ज्याअर्थी, सेवा किंवा लाभ किंवा अर्थसहाय्य देण्यासाठी ओळख पटविणारा दस्तऐवज म्हणून, आधारचा वापर केल्यामुळे, शासनाची सुपूर्दगी प्रक्रिया सुलभ होते, त्यात पारदर्शकता येते व कार्यक्षमता वाढते, आणि एखाद्या व्यक्तीची ओळख पटविण्यासाठी बहुविध दस्तऐवज सादर करण्याची गरज टाळून लाभार्थ्यांना सोईस्कर व अखंडित रीतीने त्यांचे हक्क, थेट प्राप्त होणे शक्य होते ;

आणि ज्याअर्थी, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, ज्येष्ठ कलाकारांच्या बँक खात्यात मानधनाचे संवितरण करण्यासाठी "राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ कलाकार व साहित्यिक सन्मान योजना" (यात यापुढे जिचा निर्देश, "योजना" असा केला आहे) राबवित असून, तिची सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत (यात यापुढे जिचा निर्देश, "अंमलबजावणी एजन्सी" असा केला आहे) अंमलबजावणी केली जात आहे ;

आणि ज्याअर्थी, विद्यमान योजनेच्या, मार्गदर्शक तत्त्वांनुसार अंमलबजावणी एजन्सीद्वारे ज्येष्ठ कलाकारांना (यात यापुढे ज्यांचा निर्देश, "लाभार्थी" असा केला आहे) या योजनेअंतर्गत, मानधनाचे (यात यापुढे ज्याचा निर्देश, "लाभ" असा केला आहे) संवितरण केले जाते ;

आणि ज्याअर्थी, या योजनेमध्ये, महाराष्ट्र राज्याच्या एकत्रित निधीमधून केलेल्या आवर्ती खर्चाचा समावेश होतो.

त्याअर्थी, आता, आधार (वित्तीय व इतर अर्थसहाय्य, लाभ व सेवा यांचे लक्ष्यित वितरण) अधिनियम, २०१६ (२०१६ चा १८) (यात यापुढे ज्याचा निर्देश, "उक्त अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ७ ला अनुसरुन, महाराष्ट्र शासन, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिसूचित करीत आहेः—

**१.** (१) या योजनेखालील लाभ मिळण्यासाठी इच्छुक असणाऱ्या पात्र व्यक्तीने, याद्वारे, आधार क्रमांक धारण केल्याचा पुरावा किंवा आधार क्रमांकाचे अधिप्रमाणन केल्याचा पुरवा सादर करणे आवश्यक असेल.

(२) या योजनेखालील लाभ मिळण्यासाठी इच्छुक असणारी जी व्यक्ती, आधार क्रमांक धारण करीत नाही अथवा जिने अद्याप आधार क्रमांक मिळण्यासाठी नाव नोंदणी केलेली नाही, अशा कोणत्याही व्यक्तीने, योजनेकरिता नोंदणी करण्यापूर्वी आधार क्रमांकाच्या नाव नोंदणीसाठी अर्ज करणे आवश्यक असेल, परंतु, तो, उक्त अधिनियमाच्या कलम ३ नुसार आधार क्रमांक मिळण्यासाठी हक्कदार असावा, आणि अशी व्यक्ती, आधारसाठी नाव नोंदणी करण्यासाठी कोणत्याही आधार नाव नोंदणी केंद्राला [ भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (युआयडीएआय) संकेतस्थळः www.uidai.gov.in या संकेतस्थळावर सूची उपलब्ध आहे ] भेट देईल.

(३) आधार (नाव नोंदणी व अद्ययावत करणे) विनियम, २०१६ याच्या विनियम १२ नुसार, ज्यांनी अद्याप आधारसाठी नाव नोंदणी केलेली नाही अशा लाभार्थ्यांकरिता विभागाने, त्याच्या अंमलबजावणी अभिकरणामार्फत, आधार नाव नोंदणी सुविधा देऊ करणे आवश्यक असून जर, संबंधित गटात किंवा तालुक्यात किंवा तहसीलात कोणतेही आधार नाव नोंदणी केंद्र स्थित नसेल तर, विभाग, त्याच्या अंमलबजावणी अभिकरणामार्फत, युआयडीएआयच्या विद्यमान प्रबंधकाच्या समन्वयाने किंवा ते स्वतःच युआयडीएआयचे प्रबंधक होऊन सोयीच्या ठिकाणी आधार नाव नोंदणी सुविधा पुरवीलः

परंतु, लाभार्थ्यास, आधार क्रमांक नेमून देण्याच्या वेळेपर्यंत, पुढील दस्तऐवज सादर करण्याच्या अधीन राहून, अशा लाभार्थ्यास, या योजनेखालील लाभ देण्यात येतीलः—

(क) जर नाव नोंदणी केली असेल तर, तिची आधार नाव नोंदणी ओळख पावती; आणि

(ख) पुढीलपैकी कोणताही दस्तऐवजः—

(एक) बँकेची किंवा डाक कार्यालयाची छायाचित्र असलेली खाते-पुस्तिका; किंवा

(दोन) स्थायी लेखा क्रमांक पत्र ( PAN card); किंवा

(तीन) पारपत्र (पासपोर्ट); किंवा

(चार) शिधा वाटप पत्रिका; किंवा

(पाच) मतदार ओळखपत्र; किंवा

(सहा) मनरेगा पत्रिका; किंवा

(सात) छायाचित्र असलेली किसान खाते - पुस्तिका; किंवा

(आठ) मोटार वाहन अधिनियम, १९८८ ( १९८८ चा ५९ ) अन्वये लायसन देणाऱ्या प्राधिकरणाने दिलेले वाहन चालन लायसन; किंवा

(नऊ) राजपत्रित अधिकाऱ्याने शासकीय नाममुद्रित पत्रावर दिलेले अशा व्यक्तीचे छायाचित्र असलेले ओळख प्रमाणपत्र; किंवा

(दहा ) विभागाने विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे इतर कोणताही दस्तऐवजः

परंतु आणखी असे की, त्या प्रयोजनासाठी राज्य शासनाच्या प्रशासनाद्वारे विशेषरित्या पदनिर्देशित केलेल्या अधिकाऱ्याद्वारे वरील दस्तऐवज तपासण्यात येतील.

**२.** या योजनेअंतर्गत, लाभार्थ्यांना सुलभतेने लाभ पुरविण्याच्या दृष्टीने, आधारच्या उक्त आवश्यकतेची लाभार्थ्यांना जाणीव करून देण्याकरिता माध्यमांमार्फत व्यापक प्रसिद्धी देण्यात येईल याची सुनिश्चिती करण्यासाठी विभाग, अंमलबजावणी अभिकरणामार्फत आवश्यक त्या सर्व व्यवस्था करील.

**३.** जेव्हा लाभार्थ्यांच्या निकृष्ट बायोमेट्रिक्समुळे किंवा इतर कोणत्याही कारणांमुळे आधार अधिप्रमाणन निष्फळ ठरेल तेव्हा, अशा सर्व प्रकरणी, पुढील सुधारात्मक कार्यतंत्रांचा अंगीकार करण्यात येईलः—

(क) बोटाच्या ठशांचा दर्जा निकृष्ट असेल अशा बाबतीत, अधिप्रमाणनासाठी डोळ्यातील बुब्बुळाची प्रतिमा स्कॅन करण्याची (आयरिस) किंवा चेहऱ्याचे अधिप्रमाणन करण्याची सुविधा अंगीकारण्यात येईल, त्याद्वारे, विभाग, त्यांच्या अंमलबजावणी अभिकरणामार्फत, अखंडरीतीने लाभ देण्यासाठी बोटांच्या ठशांच्या अधिप्रमाणनासह डोळ्यातील बुब्बुळाची प्रतिमा स्कॅन करण्यासाठी (आयरिस स्कॅनर) किंवा चेहऱ्याचे अधिप्रमाणन करण्यासाठी तरतुदी करील ;

(ख) बोटाचे ठसे घेणे किंवा डोळ्यातील बुब्बुळाची प्रतिमा स्कॅन (आयरिस स्कॅन) करणे किंवा चेहऱ्याचे अधिप्रमाणन करणे यांमार्फत बायोमेट्रिक अधिप्रमाणन यशस्वी होत नसेल अशा बाबतीत, जेव्हा जेव्हा सुसाध्य व अनुज्ञेय असेल तेव्हा, आधार एक वेळ परवलीचा शब्द (वन टाइम पासवर्ड), किंवा यथास्थिति, मर्यादित काळासाठी वैधता असलेला वेळ आधारित एक वेळ परवलीचा शब्द ( टाइम बेस्ड वन टाइम पासवर्ड) याद्वारे अधिप्रमाणन करण्यात येईल ;

(ग) जेव्हा बायोमेट्रिक किंवा आधार एक वेळ परवलीचा शब्द (वन टाइम पासवर्ड) किंवा वेळ आधारित एक वेळ परवलीचा शब्द (टाइम बेस्ड वन टाइम पासवर्ड) शक्य नसेल तेव्हा अशा इतर सर्व बाबतीत, योजनेखालील लाभ, प्रत्यक्ष आधार पत्राच्या आधारे देता येतील, त्याची अधिप्रमाणता, आधार पत्रावर मुद्रित केलेल्या शीघ्र प्रतिसाद संकेतांकामार्फत (क्यूआरकोड) पडताळता येऊ शकेल आणि विभागाद्वारे, त्याच्या अंमलबजावणी अभिकरणामार्फत, सोईस्कर ठिकाणी शीघ्र प्रतिसाद संकेतांक (क्यूआरकोड) वाचकाची आवश्यक ती व्यवस्था करण्यात येईल.

४. वरील गोष्टींशिवाय, कोणताही खरा लाभार्थी, या योजनेखालील त्याच्या देय लाभापासून वंचित राहणार नाही याची सुनिश्चिती करण्याच्या दृष्टीने, विभाग, त्याच्या अंमलबजावणी एजन्सीमार्फत थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) अभियान, कॅबिनेट सचिवालय, भारत सरकार, दिनांक १९ डिसेंबर, २०१७ च्या कार्यालयीन ज्ञापनात नमूद केल्यानुसार अपवाद हाताळणी यंत्रणेचे अनुपालन करील.

५. ही अधिसूचना, **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**विकास खारगे,**
शासनाचे प्रधान सचिव.

## TOURISM AND CULTURAL AFFAIRS DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg,
Hutatma Rajguru Chowk, Mumbai 400 032,
Dated the 15th May 2024.

*NOTIFICATION*

Aadhaar (Targeted Delivery of Financial and Other Subsidies, Benefits and Services) Act, 2016.

No. SANKIRN 8224/CR48 (PART-1)/CA4.—Whereas, the use of Aadhaar as an identity document for delivery of services or benefits or subsidies simplifies the Government delivery processes, brings in transparency and efficiency, and enables beneficiaries to get their entitlements directly in a convenient and seamless manner by obviating the need to produce multiple documents to prove one's identity ;

And whereas, the Tourism and Cultural Affairs Department is administering the "Rajarshi Shahu Maharaj Senior Artist and Literary Honorary Scheme" (hereinafter referred to as the "Scheme") to disburse the honorarium to senior Artist in bank account which is being implemented through the Directorate of Cultural Affairs (hereinafter referred to as "the Implementing Agency") ;

And whereas, under the Scheme, the disbursement of honorarium (hereinafter referred to as "the benefit") to the senior Artist (hereinafter referred to as the beneficiaries) by the Implementing Agency as per the extant Schemes guidelines ;

And whereas, the aforesaid Scheme involves recurring expenditure incurred from the Consolidated Fund of the State of Maharashtra.

Now, therefore, in pursuance of section 7 of the Aadhaar (Targeted Delivery of Financial and Other Subsidies, Benefits and Services) Act, 2016 (18 of 2016) (hereinafter referred to as "the said Act"), the Government of Maharashtra hereby notifies the following, namely:—

**1.** (*1*) An individual desirous of availing the benefits under the Scheme shall hereby be required to furnish proof of possession of the Aadhaar number or undergo Aadhaar authentication.

(*2*) Any individual desirous of availing benefits under the Scheme, who does not possess the Aadhaar number or, has not yet enrolled for Aadhaar, shall be required to make an application for Aadhaar enrolment before registering for the Scheme provided that he is entitled to obtain Aadhaar number as per section 3 of the said Act, and such individual shall visit any Aadhaar enrolment centre [ list available at the Unique Identification Authority of India (UIDAI) website www.uidai.gov.in ] to get enrolled for Aadhaar.

(*3*) As per regulation 12 of the Aadhaar (Enrollment and Update) Regulations, 2016, the Department through Implementing Agency, is required to offer Aadhaar enrolment facilities for the beneficiaries who are not yet enrolled for Aadhaar and in case there is no Aadhaar enrolment centre located in the respective Block or Taluka or Tehsil, the Department through its Implementing Agency shall provide Aadhaar enrolment facilities at convenient locations in co-ordination with the existing Registrars of UIDAI or by becoming UIDAI Registrar themselves :

Provided that, till the time Aadhaar is assigned to the beneficiary, benefits under the Scheme shall be given to such beneficiary, subject to the production of the following documents, namely:-

(*a*) if he has enrolled, his Aadhaar Enrolment Identification slip ; and

(*b*) any of the following documents, namely :-

(*i*) Bank or Post Office Passbook with Photograph ; or

(*ii*) Permanent Account Number (PAN) Card ; or

(*iii*) Passport ; or

(*iv*) Ration Card ; or

(*v*) Voter Identity Card ; or

(*vi*) MGNREGA Card ; or

(*vii*) Kisan Photo Passbook ; or

(*viii*) Driving license issued by the Licensing Authority under the Motor Vehicles Act, 1988 (59 of 1988) ; or

(*ix*) Certificate of identity having photo of individual issued by a Gazetted Officer on an official letterhead ; or

(*x*) Any other documents as specified by the Department :

Provided further that, the above documents shall be checked by an officer specifically designated by the State Government Administration for that purpose.

**2.** In order to provide benefits to the beneficiaries under the Scheme conveniently, the Department through its Implementing Agency shall make all the required arrangements to ensure that wide publicity through the media shall be given to the beneficiaries to make them aware of the said requirement.

**3.** In all cases, where Aadhaar authentication fails due to poor biometrics of the beneficiaries or due to any other reason, the following remedial mechanism shall be adopted, namely:-

(*a*) in case of poor fingerprint quality, Integrated Risk Information System (IRIS) scan or face authentication facility shall be adopted for authentication, thereby the Department through its Implementing Agency shall make provisions for IRIS scanners or face authentication along with fingerprint authentication for delivery of benefits in seamless manner ;

(*b*) in case the biometric authentication through fingerprints or IRIS scan or face authentication is not successful, wherever feasible and admissible authentication by Aadhaar One Time Password (OTP) or Time based One Time Password (TOTP) with limited time validity, as the case may be, shall be offered ;

(*c*) in all other cases, where biometric or Aadhaar One Time Password (OTP) or Time based One Time Password (TOTP) authentication is not possible, benefits under the Scheme may be given on the basis of physical Aadhaar letter whose authenticity can be verified through the Quick Response Code printed on the Aadhaar letter and the necessary arrangements of Quick Response Code reader shall be provided at the convenient location by the Department through its Implementing Agency.

**4.** In addition to above, in order to ensure that no bonafide beneficiary under the Scheme is deprived of his due benefits, the Department through its Implementing Agency shall follow the exception handling mechanism as outlined in the Office Memorandum of DBT Mission, Cabinet Secretariat, Government of India, dated the 19th December of 2017.

**5.** This notification shall come into effect from the date of its publication in the Maharashtra *Official Gazette*.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VIKAS KHARAGE,
Principal Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.